# KONECRANES CODE OF CONDUCT

KONECRANES
Lifting Businesses™


प्रिय सहकर्मचारी, ........ 3
1. सामान्य परिचय ........ 5
2. कायदे आणि नियम ........ 5
3. निष्पक्ष स्पर्धा आणि स्पर्धात्मक कायद्यांची अनुसरता ........ 5
4. गोपनीयता, वैयक्तिक डेटा संरक्षण आणि खाजगीयता ........ 6
5. Konecranesच्या मालमत्तांचे संरक्षण आणि योग्य वापर ........ 7
6. अंतर्गत ट्रेडिंग आणि अंतर्गत माहितीच्या बेकायदेशीर प्रकटीकरणापासून प्रतिबंध ........ 7
7. आपल्या ग्राहक आणि विक्रेत्याला जाणणे ("KYC") ........ 8
8. आर्थिक दंड आणि प्रतिबंधने ........ 8
9. संगणक आणि संप्रेषण संसाधने ........ 9
10. आर्थिक अहवाल ........ 10
11. Konecranesची पुस्तके आणि नोंदी ........ 10
12. रेकॉर्ड धारणा ........ 11
13. मानवी हक्क ........ 11
14. वातावरण ........ 11
15. समान संधी आणि गैर-भेदभाव ........ 12
16. लैंगिक आणि अन्य प्रकारच्या छळवणूक ........ 12
17. आरोग्य आणि सुरक्षा ........ 13
18. हितसंबंध संघर्ष ........ 13
19. भ्रष्टाचार किंवा लाच ........ 14
20. पुरवठादार आणि उपकंत्राटदार ........ 14
21. मिडियासोबत नातेसंबंध ........ 15
22. अंमलबजावणी ........ 15
23. नियंत्रित करणे आणि अहवाल देणे ........ 16
संपर्क माहिती : ........ 16

**प्रिय सहकर्मचारी,**

Konecranesचे चांगले नाव आणि प्रतिष्ठा हे आमची मूल्ये तसेच आपण सर्वांचे समर्पण आणि कठोर परिश्रमाचे फळ आहे. एकत्रितपणे, आम्ही या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यास आणि ती वाढवण्यासाठी जबाबदार आहोत. Konecranesचे कर्मचारी हे संस्कृतीच्या समुदायाचे प्रतिनिधित्व करतात, मोठ्या प्रमाणात भिन्न भाषा बोलतात आणि भिन्न धर्माचे आहेत. केवळ आमच्या व्यवसायाला लागू होणारे कायदे, नियम आणि विनिमयांचे पालन करणे हाच आमचा उद्देश नाही; तर आम्ही कायदेशीर आणि नैतिक व्यवसाय आचरणाच्या उच्च मानकांचे पालन करण्याचा प्रयत्न करतो.

आम्ही प्रत्यक्ष, पारदर्शक आणि नैतिक पद्धतीने व्यवसाय करतो. आम्ही आमच्या शब्दांसाठी आणि कृतींसाठी जबाबदार आहोत आणि आव्हानात्मक आणि परिपूर्ण कार्य वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतो जे संघ कार्यासाठी एक प्रतिफळ देते. आम्ही वैविध्यपूर्ण कार्यशैली, जीवनशैली आणि भिन्न संस्कृतींचा आदर करतो आणि त्यांना मान्यता देतो.

ही आचारसंहिता आम्ही कसा व्यवसाय  करतो यासाठीच्या आमच्या मूलभूत आवश्यकता आणि मार्गदर्शकतत्वे प्रदान करते आणि आम्ही आमच्या संचालनामध्ये राखून ठेवत असलेल्या मानकांचे वर्णन करते. हि आमची व्यवसायाची नैतिक तत्वे आणि अंखडत्वासाठीची आमची वचनबद्धता यावर अवलंबून आहे, जे सर्व कर्मचारी, संचालक, सल्लागार, एजंट्स, कंत्राटदार, उप-कंत्राटदार आणि आमच्या जगभरातील व्यवसाय यूनिट्सला लागू होते. ही आचारसंहिता आम्ही संचालित करत असलेल्या ठिकाणाचे कायदे आणि नियमांच्या सहित लागू करणे आवश्यक आहे.

आचारसंहितेमध्ये नमूद केलेली धोरणे आपल्या नैतिक व्यवसाय मानके कायम ठेवण्याच्या दीर्घकालीन परंपरेचा भाग आहेत. कृपया आचारसंहिता काळजीपूर्वक वाचा आणि आपल्याला त्यातील विषय, पालन न करण्याचे परिणाम आणि Konecranes समूहाच्या यशासाठी आचारसंहितेचे महत्व समजले असल्याची खात्री करा.

आपल्याला कोणतेही प्रश्न असल्यास, कृपया आपल्या सर्वात नजीकच्या व्यवस्थापक, Konecranes अनुसरता आणि नैतिकता अधिकारी किंवा या आचारसंहितेमध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही इतर व्यक्तींशी बोला. विशिष्ट पद्धत किंवा बाबींचे औचित्य किंवा मालकीविषयी शंका असताना, आपण योग्यमार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

या आचारसंहितेच्या तत्वांना समर्थन देणे आणि उद्भवू शकणारी कोणतीही उल्लंघने किंवा संभाव्य उल्लंघनाविषयी त्वरित कळवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. या विषयांविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रश्नांचे स्पष्टीकरण देणे आणि समस्यांचे निराकरण करणे हे Konecranesला एक निरोगी कार्यस्थान आणि  करण्याउत्तम जागतिक संस्था बनवण्याकरता बनवण्याचे महत्वाचे भाग आहेत.

विनम्र,

रॉब स्मिथ

अध्यक्ष आणि मुख्यकार्यकारी अधिकारी [सीईओ]

## 1. सामान्य परिचय

जबाबदार व्यवसाय पद्धती या दीर्घकालीन स्पर्धात्मक कार्यप्रदर्शन आणि नफ्याची शाश्वती देण्यासाठी महत्वाच्या असतात. Konecranesमधील व्यवस्थापन संस्कृती ही आमच्या कंपनीच्या मूल्यांवर आधारित आहे: लोकांवरील विश्वास, एकूण सेवा वचनबद्धता आणि निरंतर लाभ. व्यवस्थापन पद्धती या शाश्वत विकासाच्या सर्वसामान्य तत्वांवर आधारित आहेत, जी आमच्या व्यवसाय क्रियाकलापांमध्ये आर्थिक , सामाजिक आणि पर्यावरणीय उद्देशांच्या एकीकरणावर जोर देतात. Konecranes युनायटेड नेशन्स ग्लोबल कॉम्पॅक्ट धोरणात्मक सुरूवातीमध्ये सहभाग घेते आणि मानवी हक्क, श्रम, पर्यावरण आणि भ्रष्टाचार-विरोध या क्षेत्रांमध्ये दहा वैश्विकरित्या स्वीकृत तत्वांचे समर्थन करते.

Konecranes आचारसंहिता मूलभूत आवश्यकता आणि आम्ही कसा व्यवसाय करतो याच्या मार्गदर्शनाचा सारांश देतो. Konecranes उच्च नैतिक आचरणाचा प्रयत्न करते आणि या तत्वांसह आम्ही कायदेशीर आणि नैतिक मानकांचे वर्णन करतो, जे आम्ही आमचे ग्राहक, व्यावसायिक भागीदार, पुरवठादार आणि कर्मचाऱ्यांसाठी आणि आम्ही व्यवसाय करत असलेल्या सर्व देशांमधील समाज आणि आर्थिक बाजारपेठेमध्ये राखून ठेवतो.

संस्थेमधील प्रत्येक कर्मचाऱ्याने संस्थेतील पदाचा विचार न करता, आवश्यक स्थानिक किंवा आंतरराष्ट्रीय कायदे आणि अन्य वैधनियामक निर्दिष्ट करत नसल्यास, या आचारसंहितेचा प्रचार करणे आणि त्याचे पालन करणे अपेक्षित आहे.

## 2. कायदे आणि नियम

Konecranesला लागू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पूर्णपणे पालन करण्यास वचनबद्ध आहे. यामध्ये , उदाहरणार्थ, स्पर्धेचे कायदे आणि नियम, कॉर्पोरेट शासन, कर, आर्थिक प्रकटीकरण, सुरक्षा, लाचलुचपत प्रतिबंध, बेकायदेशीर देयके आणि भ्रष्टाचार, कर्मचारी हक्क, वातावरणीय संरक्षण आणि कंपनी मालमत्तांची ओळख आणि संरक्षण, कॉपीराइट्स आणि अन्य स्वरूपाच्या बौद्धिक मालमत्तेचा समावेश आहे.

Konecranes पारदर्शकतेने आणि Konecranes त्याच्या भागधारक, भागीदार, क्लायंट्स, पुरवठादार, कर्मचारी आणि समुदायासह असलेल्या वचनबद्धतेनुसार उत्तम कॉर्पोरेट शासनाचे नियम, मार्गदर्शकतत्वे आणि त्या तत्वांनुसार व्यवस्थापित केले जाईल.

## 3. निष्पक्ष स्पर्धा आणि स्पर्धात्मक कायद्यांची अनुसरता

Konecranes निष्पक्ष स्पर्धेचे समर्थन करते आणि त्यासाठी प्रयत्न करते आणि ते लागू स्पर्धात्मक कायद्यांचे पालन करण्यासाठी वचनबद्ध आहे. Konecranes कोणत्याही अशा क्रियाकलापांपासून परावृत्त राहील ज्या निष्पक्ष स्पर्धेचा

प्रतिरोध करतील किंवा स्पर्धात्मक कायद्यासंबंधित शंका उत्पन्न करतील , उदाहरणार्थ किंमत, मार्केट शेअर्स किंवा अन्य समान अ-सार्वजनिक माहिती स्पर्धकांसह सामायिक करणे.

कृपया पुढील तपशीलांसाठी Konecranes स्पर्धा धोरणाचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles येथे मिळू शकते.

## 4. गोपनीयता, वैयक्तिक डेटा संरक्षण आणि खाजगीयता

Konecranes आणि त्याचे भागीदार, ग्राहक, पुरवठादार आणि कर्मचाऱ्यांविषयीची गोपनीय माहिती गुपित ठेवणे आणि अनधिकृत प्रवेशाविरुद्ध संरक्षित करणे आवश्यक आहे. कर्मचारी वैयक्तिक लाभासाठी त्यांच्या कामाचा भाग म्हणून गोपनीय माहिती वापरू शकणार नाहीत किंवा कोणत्याही अनधिकृत पक्षांना गोपनीय माहिती उघड करणार नाहीत.

Konecranes त्याचे भागधारक आणि कर्मचाऱ्यांच्या गोपनीयता आणि अखंडत्वाचा आदर करते आणि वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करत असताना कठोर मानके लागू करण्याचे उद्दिष्ट ठेवते. Konecranes अशी वैयक्तिक माहिती गोळा करते आणि कायम ठेवते ज्याला कायद्याद्वारे अनुमती आहे आणि त्याच्या प्रभावी संचालनांसाठी योग्य आहे. Konecranesने गोळा केलेल्या आणि ठेवलेल्या सर्व वैयक्तिक डेटाचे निष्पक्षपणे, कायद्यानुसार आणि काळजीपूर्वक आणि आमचे कर्मचारी आणि अन्य व्यक्ती गोपनीयतेचे संरक्षण होईल अशा प्रकारे प्रक्रिया केली जाईल.

कोणताही वैयक्तिक डेटा गोळा करणारे किंवा त्यावर प्रक्रिया करणारे कर्मचारी, वैयक्तिक डेटा कायम ठेवण्यासाठी जबाबदार आहेत आणि अशा माहितीवर ज्यांनी प्रवेश प्रदान केलेला आहे त्यांनी केवळ प्रत्येक डेटा फाइलसाठी वैयक्तिक डेटासाठी आखलेल्या उद्देशांसाठी आणि मर्यादांमध्ये वापर करणे आवश्यक आहे. MyKonecranes > Internal Knowledge > Departments > Data Protection. कर्मचारी लागू कायदे किंवा सूचनांचे उल्लंघन करून वैयक्तिक डेटा उघड करणार नाहीत. वैयक्तिक रेकॉर्ड्सवरील प्रवेश योग्य प्रमाणीकरण असलेल्या व्यक्तीपर्यंत आणि त्या माहितीसाठी स्पष्ट व्यवसाय आवश्यकतेपर्यंत मर्यादित आहे.

## 5. Konecranesच्या मालमत्तांचे संरक्षण आणि योग्य वापर

***Konecranes* मालमत्ता**

या आचारसंहितेसाठी सर्व कर्मचाऱ्यांनी Konecranesच्या मालमत्तांचे संरक्षण करणे आणि [1]कायदेशीर व्यवसाय उद्देशांसाठी त्यांच्या पुरेशा वापराची पुष्टी करणे आवश्यक आहे. चोरी, निष्काळजीपणा आणि अपव्ययाचा Konecranesच्या लाभावर थेट परिणाम होतो. कर्मचाऱ्यांनी Konecranesच्या मालमत्तेचे नुकसान आणि चोरी किंवा गैरवापराला प्रतिबंध करण्यासाठी पाऊले उचलणे अपेक्षित आहे. कोणताही कर्मचारी जेव्हा Konecranes सोडतो तेव्हा Konecranesच्या मालकीची सर्व मालमत्ता परत करणे आवश्यक आहे. विशेषतः अधिकृत असलेल्या Konecranes मालमत्तांव्यतिरिक्त, ज्यामध्ये उपकरण, सामग्री, संसाधने आणि मालकीच्या माहितीचा समावेश आहे, केवळ व्यावसायिक उद्देशाने वापरणे आवश्यक आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी Konecranesच्या निधी आणि मालमत्तेचा त्याचा/ तिच्या स्वतःची असल्याप्रमाणे संरक्षण करणे, गैरवापर, नुकसान, फसवणूक किंवा चोरीविरुद्ध संरक्षण करणे अपेक्षित आहे.

## 6. अंतर्गत ट्रेडिंग आणि अंतर्गत माहितीच्या बेकायदेशीर प्रकटीकरणापासून प्रतिबंध

Konecranes अंतर्गत माहिती सुरक्षित आणि संरक्षित आहे हे सुनिश्चित करून संबंधित सुरक्षांचा आदर करते आणि त्याचे अनुसरण करते.

अंतर्गत माहिती म्हणजे अचूक असलेली कोणतीही माहिती, जी सार्वजनिक केलेली नाही, Konecranes किंवा सार्वजनिकरित्या व्यवहारातील आर्थिक साधनांचा कोणतेही अन्य जारीकर्त्याशी किंवा Konecranesने जारी केलेले कोणतेही आर्थिक साधनांशी (शेअर्ससह ) प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जोडलेली नाही, आणि जर सार्वजनिक केल्यास, जिचा त्या आर्थिक साधनांच्या किंमतीवर किंवा संबंधित उत्पन्न आर्थिक साधनांवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता आहे. सुरक्षेच्या किंवा अन्य आर्थिक साधनांच्या किंमतीवर अंतर्गत माहितीचा प्रभाव सकारात्मक किंवा नकारात्मक असू शकतो.

Konecranes येथे त्यांच्या कार्यकर्तव्य पार पाडण्यामध्ये, कर्मचारी अंतर्गत माहिती किंवा Konecranes स्वतः, Konecranes पुरवठादार, ग्राहक आणि अन्य प्रतिपक्षाच्या अन्य अ-सार्वजनिक माहिती मिळवू शकतो. जेव्हाही

---

1 मालमत्तेची Konecranesच्या मोबाईल फोन्स आणि संगणक यासारखी मालकीची मालमत्ता, निधी, माहिती किंवा बौद्धिक मालमत्ता, वैयक्तिक वापरलेली उपकरणे म्हणून परिभाषा केली आहे.

त्यांच्याकडे Konecranes किंवा त्या कंपनीशी संबंधित किंवा त्याविषयीची अंतर्गत माहिती किंवा सामग्री असार्वजनिक माहिती असेल तेव्हा कर्मचाऱ्यांना Konecranesची आर्थिक साधने किंवा सार्वजनिकरित्या ट्रेड केलेल्या कंपनीची कोणतीही सुरक्षा किंवा संबंधित उत्पन्न आर्थिक साधने खरेदी करण्यापासून किंवा विकण्यापासून प्रतिबंधित केले आहे. सुरक्षा खरेदी करू किंवा विकू शकेल अशा एखाद्या व्यक्तीला अशी माहिती देणे किंवा अशा माहितीच्या आधारावर सुरक्षा खरेदी करण्याची किंवा विकण्याची शिफारस करणे – याला "टिप देणे" म्हटले जाते- लागू कायद्याअंतर्गत उघड करण्याची अनुमती दिली आहे ते वगळता कोणतीही अंतर्गत माहिती उघड करण्यास प्रतिबंधित केले आहे.

कृपया पुढील तपशीलांसाठी Konecranes Plc इनसाइडर नियमांचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes Plc Insider Regulations) येथे मिळू शकते.

## 7. आपल्या ग्राहक आणि विक्रेत्याला जाणणे ("KYC")

Konecranes केवळ त्यांच्या अनुसरता आणि एकाग्रतेची मानके सामायिक करणाऱ्या कंपन्या आणि व्यक्तींसह व्यवहार करत असल्याची खात्री करण्यात मदत करण्यासाठी, त्याने एक KYC प्रक्रिया देखील अवलंबली आहे.

कर्मचाऱ्यांनी Konecranesच्या मालमतांशी संबंधित वस्तूच्या बेकायदेशीर आचरणामध्ये सामील असलेल्या किंवा Konecranes क्रेडिट धोरणामध्ये उल्लेख केलेली KYC प्रक्रिया पास होण्यात अयशस्वी झालेल्या व्यक्तींसह व्यवसाय करणे नाकारणे आवश्यक आहे आणि कर्मचाऱ्यांनी KYC प्रक्रियेच्या कोणत्याही उल्लंघनाचा अनुसरता अधिकाऱ्या Compliance Officerला किंवा गोपनीय अहवाल चॅनेलला अहवाल देणे आवश्यक आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी स्वतःला KYC प्रक्रियेद्वारे ओळख करून देणे आणि त्याचे पालन करणे आवश्यक आहे.

कृपया पुढील तपशीलांसाठी Konecranes क्रेडिट धोरणाचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes Group Credit Policy) येथे मिळू शकते.

## 8. आर्थिक दंड आणि प्रतिबंधने

Konecranes त्याच्या व्यवसायाला लागू असलेल्या सर्व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रतिबंधांचे पालन करते. यासाठी, लागू प्रतिबंध सूचींअंतर्गत Konecranes त्याच्या जबाबदाऱ्यांशी संबंधित योग्य ती काळजी घेते. कर्मचाऱ्यांनी Konecranesने प्रदर्शित केलेल्या प्रतिबंध यादींवर दिसणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांशी व्यवहार न करणे आवश्यक आहे.

कृपया पुढील तपशीलांसाठी प्रतिबंध आणि निर्यात नियंत्रणावरील Konecranes सूचनांचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > Internal Knowledge > Export Control, Trade Compliance (Konecranes Instructions on Sanctions and Export Controls) **येथे** मिळू शकते.

## 9. संगणक आणि संप्रेषण संसाधने

Konecranesची संगणक आणि संप्रेषण संसाधने, ज्यामध्ये संगणक, स्मार्टफोन्स, व्हॉइसमेल, चॅट आणि ईमेलचा समावेश आहे, भरपूर प्रमाणात लाभ प्रदान करतो, पण ते कर्मचारी आणि Konecranesला लक्षणीय सुरक्षा आणि दायित्व जोखीम देखील सादर करते हे खूपच महत्वाचे आहे की कर्मचाऱ्यांनी त्यांचे संगणक आणि सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणे पासवर्डसह आणि अन्य संबंधित उपायांनी सुरक्षित करण्यासाठी सर्व आवश्यक उपाय करणे आवश्यक आहे. हे अशा परिस्थितींना देखील लागू होते ज्यांमध्ये कर्मचारी त्याची किंवा तिची स्वतःची उपकरणे Konecranes**ची** माहिती मिळवण्यासाठी किंवा संग्रहित करण्यासाठी वापरतात. सर्व संवेदनशील, गोपनीय किंवा प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक माहिती पासवर्डसंरक्षितअसणे आवश्यक आहे.

कर्मचाऱ्यांना त्यांचा पासवर्ड किंवा Konecranes माहिती मिळवण्यासाठी किंवा संग्रहित करण्यासाठी वापरले जात असलेले Konecranes संगणक, स्मार्टफोन किंवा संप्रेषण संसाधने किंवा वैयक्तिक उपकरणांमध्ये तडजोड झाली असल्यावर विश्वास ठेवण्यासाठी कोणतेही कारण असेल, त्यांनी त्यांचा पासवर्ड त्वरित बदलणे आणि Konecranes IT हेल्पडेस्कला त्या घटनेचा अहवाल देणे आवश्यक आहे.

कर्मचारी ईमेल, व्हॉइसमेल किंवा त्वरित संदेश पाठवण्यासाठी किंवा इंटरनेट सेवा मिळवण्यासाठी Konecranes**ची** संसाधने वापरत असताना, ते Konecranes**चे** प्रतिनिधी म्हणून कार्य करत असतात. या संसाधनांचा कोणताही अयोग्य वापर Konecranes**च्या** प्रतिष्ठेचे नुकसान करू शकतो आणि त्यांना आणि Konecranes**ला** कायदेशीर अडचणींमध्ये आणू शकतो.

संपूर्ण संस्थेमध्ये संगणन आणि नेटवर्क कनेक्शन प्रदान करण्यासाठी वापरलेली सर्व संगणन संसाधने ही Konecranes**ची** मालमत्ता आहे आणि Konecranes**च्या** व्यवसाय चालवण्यासाठी कर्मचाऱ्यांनी वापरण्याचा हेतू आहे. ईमेल आणि टेलिफोनच्या प्रासंगिक आणि अधूनमधून वैयक्तिक वापराला परवानगी आहे. खाजगी संदेश बेकायदेशीर, अनधिकृत किंवा अनैतिक हेतूने पाठवले जाणार नाहीत किंवा अशा प्रकारच्या संदेशांमध्ये कोणत्याही बेकायदेशीर सामग्रीचा समावेश असणार नाही किंवा त्यामुळे तृतीय-पक्षीय हक्कांचे उल्लंघन होणार नाही. खाजगी संदेश

एका वेगळ्या फोल्डरमध्ये सुरक्षित ठेवण्याची शिफारस केली आहे, जे खाजगी संदेश असल्याच्या शीर्षकाद्वारे ओळखले जाऊ शकते. हे इनकमिंग आणि आउटगोइंग दोन्ही संदेशांना लागू होते.

कृपया पुढील तपशीलांसाठी Konecranes IT सुरक्षा धोरणाचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes IT Security Policy) **येथे** मिळू शकते.

## 10. आर्थिक अहवाल

Konecranes मध्ये एक समान, सामान्यतः स्वीकृत संगणन तत्व मानके आणि व्याख्या आहेत ज्यांचे आर्थिक संगणनामध्ये आणि सर्व यूनिट्सद्वारे दिलेल्या अहवालांमध्ये अनुसरण केले जाते. समूह संकलित आर्थिक विधाने IFRS मानकांनुसार केली जातात.

Konecranes त्याच्या भागधारकांना त्यांची स्थिती आणि कार्यप्रदर्शनावर एकाच वेळी आणि समान मजकूरासह , पारदर्शकपणे आणि मुक्तपणे किंवा कोणत्याही समूह किंवा व्यक्तीच्या प्राधान्य किंवा मर्जीशिवाय आणि कायदा, स्टॉकएक्सचेंज नियमने आणि एक्विटी मार्केटच्या स्वीकृत पद्धतींचे पालन करून माहिती प्रदान करते.

## 11. Konecranesची पुस्तके आणि नोंदी

Konecranesने सर्व लागू कायदे आणि संगणन पद्धतींनुसार त्याच्या आर्थिक क्रियाकलापांचा रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे. सर्व व्यवहार योग्यरित्या अधिकृत असणे आणि त्यांच्या अचूकपणे आणि पूर्णपणे नोंदी ठेवणे आवश्यक आहे. चुकीच्या किंवा दिशाभूलकरणाऱ्या प्रविष्ट्या, नोंदी किंवा दस्तऐवजाला पूर्णपणे प्रतिबंध केला आहे. समर्थित दस्तऐवजांद्वारे वर्णन केल्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही उद्देशाने देय किंवा अन्य प्रकारचे खाते वापरण्याचे समजून कर्मचाऱ्यांनी कधीही चुकीचा किंवा दिशाभूल करणारा अहवाल तयार करू नये किंवा Konecranesच्या वतीने देय देऊ नये किंवा खाते उघडू नये.

एखाद्या कर्मचाऱ्याला कोणीतरी Konecranesची पुस्तके आणि नोंदींचा चुकीचा वापर करत असल्याची जाणीव किंवा संशय असल्यास, कर्मचाऱ्याने याचा त्याच्या /तिच्या सर्वात नजीकच्या व्यवस्थापकाला,
Compliance Officer किंवा गोपनीय अहवाल चॅनेलला त्वरित अहवाल द्यावा. व्यवस्थापनापासून किंवा अंतर्गत किंवा बाह्य लेखापरिक्षकांपासून माहिती लपवल्याने Konecranesचे गंभीर नुकसान होऊ शकते.

## 12. रेकॉर्ड धारणा

Konecranes रेकॉर्ड जतन करण्यासंबंधित लागू कायदे आणि नियमांचे पालन करण्यास वचनबद्ध आहे. सर्व रेकॉर्ड्स किमान, कायदे आणि नियमांच्या आवश्यक कालावधीपर्यंत कायम ठेवणे आवश्यक आहे. Konecranesच्या व्यवसायासाठी महत्वपूर्ण असलेले रेकॉर्ड्स, ज्यात कॉर्पोरेट रेकॉर्ड्स, मूळ करार इ. चा समावेश आहे ते ओळखणे आणि Konecranesच्या आवारात सुरक्षित स्थानी संग्रहित करणे आवश्यक आहे.

कर्मचारी आदेश देणे किंवा प्रलंबित किंवा विचार युक्तिवाद किंवा शासकीय चौकशीविषयी माहिती झाली असल्यास, कर्मचाऱ्याने आदेश देण्यास प्रतिक्रियाशील किंवा दाव्याशी संबंधित असलेले किंवा ते कशी प्रक्रिया करायची त्याला/तिला कायदेशीर विभागाने सल्ला देईपर्यंत चौकशीची संबंधित असलेले सर्व रेकॉर्ड्सकायम ठेवणे आणि जतन करणे आवश्यक आहे. दस्तऐवजाचे कोणत्याही भौतिक नाश कायदेशीर विभाग आणि Compliance Officer द्वारे अधिकृत असणे आवश्यक आहे.

## 13. मानवी हक्क

Konecranes मानवी हक्कांच्या UN घोषणेमध्ये परिभाषित केल्याप्रमाणे मानवी हक्कांचे समर्थन करते आणि त्यांचा आदर करते. Konecranes उदाहरणार्थ, समूहामध्ये समान संधींसाठी वंश, राष्ट्रीयता, लिंग, धर्म आणि वय आणि संपूर्ण कार्ययावर आधारित कोणत्याही भेदभावातून मुक्त होण्याचा प्रचार करते.

Konecranes असोसिएशनचे स्वातंत्र्य आणि एकत्रित सौदेबाजीसाठी हक्कांची प्रभावी ओळख बहाल करते. Konecranes लहान मुले किंवा जबरदस्ती केलेल्या कामगारांचा स्वीकार करत नाही. किंवा समूह अशा कार्यस्थितीसह न करत नाही ज्या आंतरराष्ट्रीय कायदे आणि पद्धेतींसह संघर्ष करतात. आम्हाला आमचे संपूर्ण पुरवठादार नेटवर्क आमच्या तत्वांचे पालन करणाऱ्या व्यवसाय पद्धतींमध्ये गुंतणे अपेक्षित आहे.

## 14. वातावरण

Konecranesचे वातावरणीय क्रियाकलाप लाइफ-सायकल विचारांवर आधारित आहेत. त्यांच्या ग्राहकांच्या प्रमुख आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी पर्यावरणीयरित्या प्रगत उपाय आणि सेवा विकसित करणे आणि तयार करणे हे लक्ष्य आहे. निम्न प्रसार आणि उच्च कार्यक्षमता असलेली उत्पादने आणि सेवा विकसित करण्यास उच्च प्राधान्य दिलेले आहे. नवीन तांत्रिक प्रगतीचा वापर करून कच्चा माल, प्रक्रिया, उत्पादने आणि कचरा आणि प्रसार कमी करून आमच्या आंतरिक कार्यांमध्ये देखील धारणीय विकास मिळवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

कृपया पुढील तपशीलांसाठी Konecranes वातावरण धोरणाचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes Environmental Policy) **येथे** मिळू शकते.

## 15. समान संधी आणि गैर-भेदभाव

Konecranes नोकरीवर ठेवणे आणि पद्धती, फायदे आणि वेतनाला बढती देणे यामध्ये कर्मचाऱ्याला समान संधी देते. Konecranes वंश, धर्म, रंग, लिंग, वय, वैवाहिकस्थिती, मूळराष्ट्र, लैंगिक अभिमुखता, नागरिकत्व किंवा अपंगत्व (ज्यात अर्जदार किंवा कर्मचारी जॉबची आवश्यक कार्ये रास्त शिफारशींसह किंवा त्याशिवाय करण्यासाठी पात्र असणे आवश्यक आहे) याच्या आधारावर किंवा भरती करणे, नोकरी देणे, प्लेसमेंट, बढती किंवा नोकरीच्या अन्य स्थितींमध्ये कायद्याने प्रतिबंधित केलेल्या कोणत्याही अन्य पायावर कोणताही भेदभाव सहन करणार नाही. समान संधी आणि मेरिटनुसार समान वागणूक हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे.

Konecranes भेदभावयुक्त भाषेचा वापर सहन करणार नाही किंवा कोणतेही अन्य शेरे, विनोद किंवा आक्षेपार्ह किंवा विरोधी कार्य वातावरण तयार करणारे किंवा त्यास उत्तेजन देणारे आचरणही सहन केले जाणार नाही.

कृपया पुढील तपशीलांसाठी कार्यस्थान धोरणामधील Konecranes आदराचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes Respect in the Workplace Policy) **येथे** मिळू शकते.

## 16. लैंगिक आणि अन्य प्रकारच्या छळवणूक

Konecranes लैंगिक छळवणूकीसह कार्यस्थानामधील कोणत्याही प्रकारच्या छळवणूकीस कठोरपणे प्रतिबंध करते. Konecranes छळवणूक असणाऱ्या वागणूकीला योग्य ती शिक्षा देणे आणि त्यास प्रतिबंध करण्यासाठी त्वरित आणि योग्य कारवाई करेल.

नैतिक किंवा शारीरिक छळवणूक असलेले कोणतेही आचरण किंवा कोणत्याही अन्य प्रकारच्या गैरवर्तनास तेवढ्याच प्रमाणात प्रतिबंध केला आहे.

कृपया पुढील तपशीलांसाठी कार्यस्थान धोरणामधील Konecranes आदराचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes Respect in the Workplace Policy) **येथे** आढळू शकते.

## 17. आरोग्य आणि सुरक्षा

Konecranes त्याच्या कर्मचाऱ्यांना मनोरंजक आणि आव्हानात्मक कार्य वातावरण देण्याचा प्रयत्न करते ज्यामध्ये मुक्तता, आदर, विश्वास आणि समान संधी यावर प्रभुत्व असेल. कंपनी तिच्या कर्मचारी, कंत्राटदार आणि आपल्या संस्थेच्या अन्य भागांमध्ये काम करणाऱ्या इतरांसाठी निरंतरपणे सुरक्षित आणि धोका-मुक्त कार्यस्थान विकसित करते.

Konecranes असा उत्पादन विकास आणि निर्मिती प्रक्रिया तसेच त्यांची उत्पादने आणि सेवांशी संबंधित आरोग्य आणि सुरक्षा धोके कमी करण्याचा उद्देश असलेल्या गुणवत्ता शाश्वती पद्धती देखील लागू करते.

कृपया पुढील तपशीलांसाठी Konecranes सुरक्षा धोरणाचा संदर्भ घ्या, जे MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes Safety Policy) **येथे** मिळू शकते.

## 18. हितसंबंध संघर्ष[2]

Konecranes कर्मचाऱ्यांनी अशा परिस्थितीटाळणे आवश्यक आहे ज्यात त्याचे वैयक्तिक [3] Konecranes **आणि** Konecranes**च्या** भागधारकांच्या हितसंबंधांशी संघर्ष होऊ शकतो. याचा अर्थ, उदाहरणार्थ, पाहुणचाराची रास्त आणि प्रचलित मानके ओलांडत नसलेल्या नाममात्र मूल्याच्या वैयक्तिक भेटवस्तू किंवा पाहुणचार याखेरीज कर्मचाऱ्यांना वैयक्तिक भेटवस्तू, पाहुणचार किंवा मनोरंजन स्वीकारण्याची किंवा प्रदान करण्याची अनुमती नाही. भेटवस्तू किंवा उपकार स्वीकारल्याने संभाव्य हितसंबंधांमध्ये संघर्ष उद्‌भवतील याविषयी शंका असल्यास, कर्मचाऱ्याने Compliance Officer ला आधीच परिस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे. Konecranes राजकीय पक्ष किंवा अन्य राजकीय संस्था किंवा वैयक्तिक उमेदवाराच्या निवडणूक मोहिमेला आर्थिक समर्थन देत नाही.

एखाद्या कर्मचाऱ्याला किंवा संलग्न व्यक्तीला कंपनीमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वारस्य असल्यास किंवा तो Konecranes व्यवहार करत असलेल्या किंवा Konecranesसह स्पर्धा करत असलेल्या कंपनीवर प्रभाव टाकण्यास सक्षम असल्यास विशिष्ट काळजी घेणे आवश्यक आहे. या आचारसंहितेच्या उद्देशासाठी, "संलग्नव्यक्यी" म्हणजे जोडीदार, स्थानिक भागीदार किंवा लक्षणीय इतर व्यक्ती, लहान मुले, पालक, भावंड, चुलत-मावस भावंड,

---

2विशिष्ट कर्मचाऱ्याचे वैयक्तिक स्वारस्य त्याचा/तिच्या कामाच्या कर्तव्याच्या योग्य कार्यप्रदर्शनास प्रभावित करते किंवा प्रभावित करण्यास पात्र असते तेव्हा "हितसंबंध संघर्ष" घडते जे कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक हित आणि Konecranes चे अधिकार आणि हितामधील संघर्षास वाढ देते किंवा वाढ देण्यास पात्र आहे, ज्याच्या परिणामस्वरूप Konecranes च्या अधिकार आणि हित, मालमत्ता आणि/किंवा व्यवसाय प्रतिष्ठेचे नुकसान होऊ शकते.

3पैशाच्या स्वरूपात, मौल्यवान वस्तू किंवा इतर मूर्तवस्तु किंवा सेवा आणि/किंवा अन्य मालमत्ता हक्क, मग ते त्याच्यासाठी/तिच्यासाठी, त्याचा/तिच्या कुटुंब किंवा तृतीय पक्षासाठी असले तरी, असे अन्य फायदे मिळवण्यासाठी त्याचे/तिचे कर्मचारी कर्तव्य पार पाडत असताना कर्मचाऱ्यासाठी संधींचा समावेश आहे अशा कर्मचाऱ्याचा हितसंबंध म्हणजे कर्मचाऱ्याचे "वैयक्तिक हितसंबंध" असतो.

जवळचे वैयक्तिक मित्र किंवा कोणतीही अन्य व्यक्ती (नामनिर्देशित व्यक्तींसह ) जे कर्मचाऱ्याच्या वतीने कार्य करतात. उदाहरणार्थ, एक नातेवाईक दुसऱ्यापेक्षा कमी दर्जाच्या जागेवर असल्यास हितसंबंधामधील संघर्ष वाढू शकतात.

Konecranesचे कायदेशीर हितसंबंध अग्रिम करण्याची, जेव्हाही हे करण्याची संधी असते तेव्हा, Konecraneच्या कर्मचाऱ्याची जबाबदारी असते. कर्मचारी व्यवसाय किंवा गुंतवणूक संधी शिकतो ज्यामध्ये Konecranesचे स्वारस्य असू शकते किंवा जे व्यवसाय क्रियाकलापांच्या मर्यादेमध्ये असू शकते, ज्यामध्ये कॉर्पोरेट मालमत्ता किंवा माहिती किंवा Konecranes मधील कर्मचाऱ्याचे पद, जसे की स्पर्धक किंवा वास्तविक किंवा संभाव्य ग्राहक, पुरवठादार किंवा Konecranesचे व्यवसाय संलग्नाकडून, कर्मचारी Compliance Officer च्या पूर्वलिखित मंजूरीशिवाय संधीचा पाठलाग करणार नाही किंवा त्यामध्ये सहभागी होणार नाही. कर्मचारी अयोग्य वैयक्तिक लाभासाठी कॉर्पोरेट मालमत्ता किंवा माहिती किंवा Konecranes मधील त्यांचे पद वापरू शकत नाहीत आणि कर्मचारी कदाचित Konecranesसह स्पर्धा करू शकणार नाहीत.

## 19. भ्रष्टाचार किंवा लाच

Konecranes सर्व स्वरूपाच्या भ्रष्टाचाराविरुद्ध कार्य करण्यासाठी वचनबद्ध आहे, ज्यामध्ये खंडणी आणि लाचेचा समावेश आहे. Konecranes किंवा त्याच्या कर्मचाऱ्यांनी लाच किंवा कोणत्याही प्रकारचे आर्थिक फायदे स्वीकारू, देऊ, मागू किंवा ऑफर करू नयेत. यामध्ये पैसे, फायदे, मनोरंजन किंवा सेवा किंवा सार्वजनिक अधिकारी किंवा अन्य व्यवसाय भागीदारांना किंवा त्यांच्याकडून कोणताही भौतिक फायदायांचा समावेश आहे, जे अयोग्य व्यवसाय किंवा वैयक्तिक लाभ मिळवण्याच्या उद्देशाने दिले आहेत. Konecranes कोणत्याही परिस्थितीअंतर्गत अवैध सावकारीमध्ये सहभाग किंवा समर्थन स्वीकारत नाही.

कृपया Konecranesच्या भ्रष्टाचार-विरोधी धोरणाचा संदर्भ घ्या, जे लागू भ्रष्टाचार-विरोधी कायदे, नियम आणि नियामकांचे पालन करणे सुनिश्चित करण्यासाठी कर्मचाऱ्याची जबाबदारी सांगते. ते MyKonecranes > About Konecranes > Policies and principles (Konecranes Anti-Corruption Policy) येथे मिळू शकते.

## 20. पुरवठादार आणि उपकंत्राटदार

Konecranes त्याचे पुरवठादार आणि उपकंत्राटदाराने समान उच्च कायदेशीर, नैतिक, वातावरणीय आणि कर्मचारीसंबंधित तत्वांचे पालन करून त्यांचा व्यवसाय करणे अपेक्षित आहे जे Konecranes स्वतःच लागू करते, व्यवसाय नातेसंबंध स्थापित करताना किंवा आयोजित करताना या तत्वांना उच्च महत्व दिलेले आहे. Konecranes

त्याच्या पुरवठादार किंवा उपकंत्राटदारांमध्ये या तत्वांच्या अनुप्रयोगाचा प्रचार करते आणि यासंबंधित त्याच्या कारवाया नियंत्रित करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

## 21. मिडियासोबत नातेसंबंध

केवळ अधिकृत Konecranes वक्ते किंवा CEO किंवा CFOद्वारे अधिकृत विशिष्ट कर्मचारी प्रेस, सुरक्षा विश्लेषक, आर्थिक समुदायाचे अन्य सदस्य, भागधारक किंवा समूह किंवा संस्था Konecranes प्रतिनिधी म्हणून किंवा Konecranes व्यवसायाविषयी बोलू शकतात. आर्थिक समुदाय किंवा भागधारकाकडून Konecranes विषयी आर्थिक माहितीची विनंती उपाध्यक्ष, गुंतवणूकदार संबंधाशी संदर्भितअसणे आवश्यक आहे. आर्थिक माहितीच्या विनंत्या किंवा मिडिया, प्रेसकडून Konecranes विषयी अन्य माहिती किंवा सार्वजनिक उपाध्यक्ष, विपणन आणि संप्रेषणांशी संदर्भितअसणे आवश्यक आहे.

मिडियाला दिलेली माहिती आणि सार्वजनिकरित्या प्रसारित केलेली माहिती माहिती पूर्ण आणि खरी असणे आवश्यक आहे.

Konecranes द्वारे तयार केलेली आणि संप्रेषित केलेली कोणतीही सार्वजनिक माहिती सर्व लागू कायदे आणि नियमांच्या अनुसार असणे आवश्यक आहे. Konecranesच्या कोणत्याही सार्वजनिक आर्थिक माहितीने आणि संबंधित तारीख किंवा कालावधीला Konecranesची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे, अचूकपणे आणि विश्वसनीयतेने सादर करणे, लागू वेळेमध्ये तयार करणे आवश्यक आहे.

Konecranes त्याची आर्थिक स्टेटमेंट्स प्रकाशित करण्यापूर्वी मूक कालावधीचे आणि प्रश्नामध्ये तिमाहीच्या समाप्तीपासून सुरू होणाऱ्या मध्यावधी अहवालाचे परिक्षण करतो या वेळेदरम्यान Konecranesचे प्रतिनिधी Konecranesच्या आर्थिक पदावर टिप्पणी करत नाही.

कृपया पुढील तपशीलांसाठी बाह्य संप्रेषण मार्गदर्शक तत्वेचा संदर्भ घेणे आवश्यक आहे, जे MyKonecranes > Internal Knowledge > Marketing & Communications > MarCom Guidelines (External Communication Guidelines) येथे मिळू शकते.

## 22. अंमलबजावणी

ही आचारसंहिता Konecranesच्या संचालक मंडळाने मंजूर केली आहे. ही तत्वे संपूर्ण Konecranes समूहामध्ये आणि Konecranesच्या व्यवसायाच्या सर्व क्षेत्रांमध्ये लागू आहेत. समूह व्यवस्थापन आणि त्याचे कर्मचारी या दोन्हींनी या तत्वांमध्ये दिलेल्या मानकांचे कोणत्याही अपवादांशिवाय अनुसरण करणे आवश्यक आहे.

Konecranes खात्री देते की ही तत्वे सर्व कर्मचाऱ्यांना प्रभावीपणे कळवली आहेत आणि त्याचा प्रत्येकाने अवलंब करणे आणि त्याचा प्रत्येकाने सराव करणे आवश्यक आहे. आवश्यक असेल तर, Konecranes आचारसंहिता अधिक तपशीलवार तत्त्वे आणि निर्देशांसह पूरक केली जाते.

या आचारसंहितेची अनुसरता किंवा विवचनाविषयी किंवा या तत्वांच्या संभाव्य उल्लंघनाविषयी कोणत्याही शंका किंवा प्रश्न असल्यास, Compliance Officer शी संपर्कसाधणे आवश्यक आहे.
Compliance Officer कोणत्याही संभाव्य उल्लंघनाची गंभीरता ठरवण्यासाठी आणि संभाव्य पुढील कारवाईसाठी जबाबदार आहे. या तत्वांशी संबंधित सर्व संभाव्य प्रश्न किंवा संभाव्य उल्लंघनाची चर्चा करण्यासाठी कर्मचाऱ्याने नेहमी व्यवस्थापकाशी निसंकोचपणे चर्चा करावी. या तत्वांच्या गैरवापराचा अहवाल देण्यापासून कर्मचाऱ्याला थांबवणे प्रतिबंधित केले आहे.

## 23. नियंत्रित करणे आणि अहवाल देणे

Konecranes अनुसरता व नैतिकता समितीच्या शिफारशीवर आधारित Konecranes नेतृत्व संघ (केएलटी) समिती या आचारसंहितेचे दरवर्षी पुनरावलोकन करेल आणि लेखापरिक्षण समिती आणि बोर्ड मंजूरीसाठी आवश्यक असल्यास आचारसंहितेमध्ये बदल प्रस्तावित करतील.

अंतर्गत लेखापरिक्षण आणि व्यवस्थापन Konecranes समूहामध्ये या धोरणाअंतर्गत लेखापरिक्षण करेल. अंतर्गत लेखापरिक्षण आणि वरिष्ठ व्यवस्थापन निकालांचा आणि Konecranes संचालक मंडळाच्या लेखापरिक्षण समितीने केलेल्या कोणत्याही लेखापरिक्षणाच्या संबंधित निकालांचा अहवाल देईल. संशयास्पद घटनांच्या सर्वसूचनांची (व्यक्तीने, व्हिसलब्लोईंग चॅनेलद्वारे किंवा इतर मार्गांनी दिलेल्या)
Compliance Officer द्वारे योग्य ती तपासणी केली जाईल आणि निकालांचा Konecranes अनुसरता आणि नैतिकता समिती आणि Konecranes संचालक मंडळाच्या लेखापरिक्षण समितीला अहवाल दिला जाईल.

### संपर्क माहिती :

कोणत्याही शंका किंवा प्रश्नांच्या बाबतीत कृपया श्रीमती कती मटिला Ms. Kati Mattila, Head of Compliance & Ethics

Whistleblowing Channel: https://report.whistleb.com/Konecranes

अंतर्गत आवृत्ती नियंत्रणासाठी *:*

द्वारे तयार केले आणि त्याचे पुनरावलोकन केले *:* समूह कार्यकारी समिती

मंजूरी*:* संचालक मंडळाद्वारे

प्रकाशित*:October 24, 2018*

लागू: *October 29, 2018*

*Updated: April 3, 2020*